नि.फौ.ख.क्र.२४९/२०२१
शासन–वि–माया मानेकर
नि.क्र.१७

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव – वासुदेव मारोतराव बावणे,
वय अंदाजे ४५ वर्ष, कामधंदा– मजुरी,
राहणार– काजळसरा, तालुका देवळी, जि.वर्धा

.............................................................................................................

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ ची सरतपासणी – सहायक सरकारी वकील श्री.एस.एम.दुंगे यांच्या मार्फत.**

१. फिर्यादी ही माझी पत्नी आहे. मी आरोपी मायाबाई हिस ओळखतो. ती आमचे गावात राहते. घटना दिनांक १५.०२.२०२१ रोजी सायंकाळी ४.३० वाजताचे दरम्यान हुस्नापुरे यांचे शेतात घडली होती. त्यांचे शेत मी बटईने केले होते. मी हुस्नापुरे यांचेकडून इंधन विकत घेतले होते व ते इंधन मी धु–यावर ठेवले होते. त्यावेळी शेतामध्ये चना काढण्याचे काम सुरु होते. त्यावेळी शेतात माझेसह माझी पत्नी, मोहन हुस्नापुरे, संजू कानेटकर व हिडींबावरील मजुर हजर होते. शेतात ठेवलेले इंधन आरोपी मायाबाई हिने माचीसची काडी लावून पेटवून दिले होते. त्यानंतर ती तेथून दुस–याचे शेतात निघून गेली. सदर इंधन रक्कम रुपये १५,०००/– किंमतीचे होते. संपूर्ण इंधन जळून गेले होते. त्यामुळे माझे पत्नीने पोलीस स्टेशन फिर्याद दिली होती. पोलीस दुस–या दिवशी चौकशीसाठी आले होते. पोलिसांनी माझेकडे चौकशी केली होती व बयाण नोंदविले होते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

उलट तपास आरोपीतर्फे – श्री.बी.डब्ल्यू. चौधरी विधीज्ञ यांचे मार्फत

२. फिर्यादी माझी पत्नी आहे. माझे व माझे पत्नीचे श्री.हुस्नापुरे यांचेशी चांगले संबंध आहेत. मला घटनास्थळी हजर असलेल्या मजुरांची नावे सांगता येणार नाही. हुस्नापुरे यांची पत्नी व फिर्यादी या दोघी मैत्रीणी आहेत. हे मला माहीत नाही की आरोपी व श्री.हुस्नापुरे यांची पत्नी यांचे एकमेकांशी पटत नाही किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की

हुस्नापुरे यांचे पत्नीचे सांगण्यावरुन मी व माझे पत्नीने मिळून आरोपीविरुध्द खोटा रिपोर्ट दिला. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचे त्या जागेवर कोणतेही शेत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचे शेताचा सातबारा उतारा व आठ–अ चा नमुना पोलिसांनी मला मागितला नाही व मी तो पोलिसांना दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी व हुस्नापुरे यांचे सांगण्यावरुन मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

MRUNAL YASHWANT DOIPHODE

Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.04.02 15:38:30 +0530

(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

मुख्य न्यायदंडाधिकारी,

वर्धा, दिनांक ०२–०४–२०२६

माझे समक्ष

MRUNAL YASHWANT DOIPHODE

Digitally signed by MRUNAL YASHWANT DOIPHODE
Date: 2026.04.02 15:38:36 +0530

(श्रीमती एम.वाय.डोईफोडे)

मुख्य न्यायदंडाधिकारी,

वर्धा, दिनांक ०२–०४–२०२६